पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१, पिंपरी चिंचवड
पत्ता.- जुना पुणे-मुंबई रस्ता, रेमंड शोरूम मागे,चिंचवड पुणे ४११०१९
फोन नंबर.-०२० – २७४४५४५६
ईमेल- dcpzone1.pcpc-mh@gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट** दिनांक ०२/०९/२०२३

# मारहाण करून गळयातील १५ तोळे सोन्याची चैन जबरीने हिसकावुन चोरीचे गुन्हयाची चाकण पोलीसांकडुन अवघ्या १२ तासात उकल, तीन सराईतांना अटक करून त्यांचेकडुन सोन्याची चैन सह ३,७०,०००/- रू किंमतीचा मुददेमाल हस्तगत

........................................................................................................................

दिनांक ०१/०९/२०२३ रोजी चाकण पोलीस स्टेशन येथे हजर होवुन फिर्यादी सतीष कुंडलीक गव्हाणे, वय ५७ वर्षे, धंदा हॉटेल, रा. पाटीलवाडी कोरेगाव भिमा ता शिरूर जि पुणे यांनी फिर्याद दिली की, बहुळ गावचे हददीत चाकण शिक्रापुर रोडलगत हॉटेल एस. के. येथे तीन अनोळखी चोरटयांनी मोटार सायकलवर येवुन फिर्यादी व साक्षीदार यांना लाकडी दांडके व पीव्हीसी पाईपने मारहाण करून फिर्यादी सतीष गव्हाणे यांचे गळयातील १५ तोळे वजनाची सोन्याची चैन जबरीने हिसकावुन चोरून मोटार सायकल वरून पळुन गेले आहेत. फिर्यादी यांचे तक्रारीवरून चाकण पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं ६९८/२०२३ भा द वि कलम ३९४, ३४ प्रमाणे दाखल करण्यात आलेले आहे.

सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन चाकण पोलीस स्टेशनचे वपोनि श्री. वैभव शिंगारे यांनी तसेच चाकण पोलीस स्टेशन कडील तपास पथकाने सदर गुन्हयाचे घटनास्थळी भेट दिली. त्यानंतर मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ श्री. विवेक पाटील, सहा. पोलीस आयुक्त, राजेंद्र गौर यांनी सदर गुन्हा उघडकीय आणण्याचे अनुषंगाने सुचना व मार्गदर्शन केले. डी बी पथकाने गुन्हयाचे घटनास्थळावरील फिर्यादी व साक्षीदार यांचेकडुन घटनेची सविस्तर माहिती घेतली, तसेच सदर गुन्हयाचे घटनास्थळ परीसरात तात्रींक तपास करून चाकण पोलीस स्टेशन कडील डी. बी. पथकाचे सपोनि विक्रम गायकवाड व पोना हनुमंत कांबळे, पोकॉ प्रदिप राळे, पोकॉ निखील वर्पे यांचे पथकाने कसोशीने तपास करून खेड, होलवाडी , टाकळकरवाडी तसेच वाकी बु ॥ येथे सापळा रचुन अतिषय सिताफीने आरोपी नामे १) श्रीराम संतोष होले, वय २५ वर्षे,रा.होलेवाडी ता. खेड जि. पुणे, २) प्रतिक उर्फ बंटी दत्तात्रय टाकळकर वय २१ वर्षे, रा. टाकळकरवाडी ता. खेड जि. पुणे, ३) बबलु रमेश टोपे, वय २३ वर्षे, रा. वाकी बु॥ ता खेड जि पुणे यांना ताब्यात घेतले त्यावेळी वरील आरोपींचे ताब्यातुन सदर गुन्हयातील फिर्यादी यांची चोरी केलेली सोन्याची चैन, तसेच गुन्हा करण्यासाठी वापरलेली मोटार सायकल असा एकुण ३,७०,०००/- रू. किंमतीचा मुददेमाल जप्त केला आहे. वरील अटक आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन त्यांचेवर यापुर्वी चोरी, जबरीचोरी, अवैध शस्त्र बाळगणे अशा प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. सदर गुन्हयात वरील आरोपी तीनही आरोपींना अटक करण्यात आलेली असुन त्यांची दिनांक ०५/०९/२०२३ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, श्री. विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त, श्री. सजंय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, श्री. वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ श्री. विवेक पाटील, सहा. पोलीस आयुक्त, राजेंद्र गौर यांचे सुचना व मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.वैभव शिंगारे तसेच तपास पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक विक्रम गायकवाड, पोउनि / विनोद शेंडकर, पोउनि/ सागर बामणे, पोसई अभिजीत चौगुले, सफौ/ सुरेश हिंगे, पो हवा/ राजु जाधव, संदिप सोनवणे, पोना / हनुमंत कांबळे, भैरोबा यादव, पोकॉ / नितीन गुंजाळ, निखील वर्पे, प्रदिप राळे, सुनिल भागवत, संदिप गंगावणे, मंगेश फापाळे महेश कोळी,यांनी केलेली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोसई विनोद शेंडकर हे करीत आहेत.

(विवेक पाटील )
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ-१, पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner